# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** श्रीगोंदा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0767 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/08/2025 23:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 12/08/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/08/2025
**Time From (वेळेपासून):** 11:28 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/08/2025 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 038
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/08/2025 22:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्रीगोंदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सलमा बशीर सय्यद

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जमादार गल्ली, श्रीगोंदा,श्रीगोंदा,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जमादार गल्ली, श्रीगोंदा,श्रीगोंदा,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329171344

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संभाजी शिवाजी घोडे | | | 1. मांडवगण रोड, श्रीगोंदा,श्रीगोंदा, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No.** **UIDB Number**
**(अ.क्र.)** **(यु.आय.डी.बी.क्र.)**

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 12/08/2025

मी श्रीमती सलमा बशीर सय्यद, वय 32 वर्षे , गृहिणी, रा. बाजारतळ, जमादार गल्ली, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर.

समक्ष हजर राहुन फिर्याद देते की, मी दि.11/08/2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे, ला.प्र.वि. अहिल्यानगर यांचेशी संपर्क करुन लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि. 11/08/2025 रोजी 12/00 वा. चे सुमारास श्रीगोंदा येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होते. 12/15 वा. सुमारास मी थांबले त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे पथक व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी शासकिय वाहनात बसले. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, '' माझा मुलगा सादिक बशीर सय्यद हा बी.ए.च्या प्रथम वर्षात, महाराजा कॉलेज श्रीगोंदा येथे शिक्षण घेत आहे. माझ्या मुलाची स्वालीहा ताडे नावाची मैत्रीण आहे. ती सध्या अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. स्वालीहा ताडे व माझा मुलगा सादिक यांचे फोटो कोणीतरी स्वालीहा हिचे नातेवाईकांना पाठविले होते. ते फोटो माझ्या मुलानेच पाठविले आहेत असा स्वालीहाच्या वडिलांचा गैरसमज झाल्यामुळे स्वालीहाचे वडिल रफिक ताडे हे माझा मुलगा सादिक याचेविरूध्द तक्रार देण्याकरीता दि.05/08/2025 रोजी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गेले होते. श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथील पोलीस श्री. घोडे यांनी माझे मुलास फोन करून पोलीस स्टेशन येथे बोलवुन घेतले. त्याप्रमाणे मी व माझा मुलगा सादिक असे साडेचार ते पाच वाजेचे सुमारास श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गेलो होतो. त्यावेळी तेथे स्वालीहाचे वडिल देखील हजर होते. घोडे पोलीस यांनी मला स्वालीहाचे वडिलांनी माझे मुलाचे विरूध्द तक्रार दिली असल्याचे सांगितले. मी त्यांना माझे मुलाने फोटो पाठविले नाहीत असे सांगितले. घोडे पोलीस यांनी माझे मुलाचा मोबाईल ताब्यात घेवुन ''तुच स्वालीहाचे व तुझे फोटो तिच्या नातेवाईकांना पाठविले आहेत, तुझ्याविरूध्द गुन्हा दाखल करावा लागेल असे म्हणाले. स्वालीहाच्या वडिलांनी व मी सदरचे प्रकरण आपआपसात मिटवायचे ठरवले. घोडे पोलीस यांनी माझे मुलाच्या मोबाईलमधील सर्व फोटो, मेसेज इ. डिलीट केले. घोडे पोलीस यांनी त्यांचे संगणकावर माझे मुलाचा जबाब घेतला की, त्याचे व स्वालीहाचे प्रेम असुन त्याने स्वालीहाचे लग्न जमत असलेल्या मुलाला त्यांचे दोघांचे फोटो व चॅटींग पाठविल्याने त्यांचे लग्न मोडले, त्याच्याकडुन चुक झाली, तो आता इथुन पुढे स्वालीहाला फोन करणार नाही, मेसेज पाठविणार नाही, त्यास सुधारण्याची एक संधी दयावी असे लिहुन घेतले. त्यावर त्याची सही घेतली. तसेच घोडे यांनी माझेकडुन ताबा पावती देखील घेतली, त्यात त्यांनी आमचेत व रफीक ताडे यांचेत आपआपसात समझोता झाल्याचे व माझा मुलगा सादिक हा त्याचे मोबाईल व सर्व चीज वस्तु सह माझे ताब्यात मिळाल्याचे नमुद केले आहे. परंतु त्यांनी माझ्या मुलाचा मोबाईल फोन आमच्या ताब्यात दिला नाही. मी घोडे पोलीस यांचेकडे माझे मुलाचा मोबाईल परत मागितला असता त्यांनी '' मी तुमचे प्रकरण मिटविण्याकरीता मध्यस्थी केली, तुमच्या मुलावर गुन्हा दाखल झाला असता, तो गुन्हा दाखल होवु दिला नाही, त्याच्या मोबदल्यात मला 20,000/-रुपये दया, तरच तुमचा मोबाईल परत देईल असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली. मी त्यांना माझ्याकडे एवढे पैसे नाहीत असे म्हणाले असता त्यांनी पैसे घेवुन या व मोबाईल घेवुन जा असे म्हणाले.दि. 06/08/2025 रोजी माझा मुलगा सादिक याने श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे जावुन घोडे पोलीस यांचेकडे त्याचा मोबाईल परत देण्याकरीता विनंती केली असता घोडे पोलीस हे त्यास ''मी तुम्हाला 20,000/-रुपये लागतील असे सांगितले होते'' असे म्हणाले. माझे मुलाने त्यांना आमच्याकडे एवढे पैसे नाहीत असे सांगितले असता घोडे पोलीस यांनी 12,000/-रु. तरी दयावे लागतील, तरच मोबाईल परत मिळेल असे म्हणुन 12,000/-रूपयांची मागणी

केली. माझ्या मुलाने घरी येवुन सर्व हकीकत मला सांगितली. माझे मुलाची सदर प्रकरणात काहीही चुक नसताना घोडे पोलीस आमचेकडे पैशांची मागणी करत आहेत. आम्हाला घोडे पोलीस यांना लाच देण्याची ईच्छा नाही.मी आज दि.11/08/2025 रोजी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे जावुन घोडे पोलीस यांची भेट घेणार आहे व त्यांना माझे मुलाचा मोबाईल परत देणेबाबत विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझे मुलाचा मोबाईल परत देण्याच्या मोबदल्यात व आमचे प्रकरण आपआपसात मिटविण्याकरीता मध्यस्थी केल्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. माझ्यात व घोडे पोलीस यांच्यात कोणताही आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. घोडे पोलीस यांनी लाचेची मागणी केल्यास सदर रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करीन. वगैरे मजकुराची तक्रार सांगीतली व ती माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली त्यावर मी, श्री.त्रिपुटे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर मी नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये श्री.त्रिपुटे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या ताब्यात दिला. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील दुचाकी वाहनाने घोडे पोलीस यांची भेट घेण्याकरीता श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे जाण्याकरीता दुपारी 01/43 वाजेच्या सुमारास रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी माझे मोबाईल फोनचा स्पिकर चालु करून घोडे पोलीस यांना फोन केला असता त्यांनी ते पोलीस स्टेशनला नाहीत, तास दिड तासात येणार आहेत असे सांगुन मला चार पाच वाजता या असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तिथुन निघुन सापळा पथक थांबले त्या सुरक्षित ठिकाणी 02/05 वा. दरम्यान परत आलो. श्री. त्रिपुटे यांनी पंच नं. 1 यांना व मला घडलेल्या घटनेबाबत विचारले असता मी व पंच नं. 1 यांनी घडलेली हकीकत सांगितली. घोडे पोलीस यांनी मला चार-पाच वाजता या असे सांगितल्याने त्यांची भेट घेण्याकरीता पाच वाजेदरम्यान पाठविण्याचे सर्वानुमते ठरले. श्री.त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना पुन्हा सुचना समजावुन सांगितल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे ताब्यात दिले. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील दुचाकी वाहनाने घोडे पोलीस यांची भेट घेण्याकरीता श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे जाण्याकरीता दुपारी 04/42 वा. रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी माझे मोबाईल फोनचा स्पिकर चालु करून घोडे पोलीस यांना फोन करून मी पोलीस स्टेशन येथे आले आहे असे सांगितले असता त्यांनी ते पोलीस स्टेशनला नाहीत, बाहेर आहेत, तुम्हाला फोन करतो आल्यानंतर असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तिथुन निघुन सापळा पथक थांबले त्या सुरक्षित ठिकाणी 05/00 वा. दरम्यान परत आलो. श्री. त्रिपुटे यांनी पंच नं. 1 यांना व मला घडलेल्या घटनेबाबत विचारले असता मी व पंच नं. 1 यांनी घडलेली हकीकत सांगितली. घोडे पोलीस यांनी पोलीस स्टेशनला नसल्याचे व आल्यानंतर फोन करतो असे सांगितल्याने त्यांचे फोनची वाट पाहण्याचे सर्वानुमते ठरले. बराच वेळ होवुनही घोडे पोलीस यांचा फोन आला नाही. मी श्री. त्रिपुटे यांना कळविले की आता रात्रीचे नऊ वाजत आले आहेत, आता घोडे पोलीस हे मला फोन करणार नाहीत, ते कदाचित मला उदया सकाळी फोन करतील असे कळविल्याने दि. 11/08/2025 रोजीची कारवाई तात्पुरती स्थगित करून घोडे यांचेविरूध्द दि.12/08/2025 रोजी पुढील कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले. श्री. त्रिपुटे यांनी मला झाले कारवाई बाबत गोपनियता राखण्याबाबतच्या सुचना समजावुन सांगितल्या व दि. 12/08/2025 रोजी याच सुरक्षित ठिकाणी सकाळी 11/00 वा. सुमारास हजर राहण्याबाबत सांगितले. त्यानंतर श्री. त्रिपुटे व सापळा पथक अहिल्यानगरला गेले.

दि.12/08/2025 रोजी मी 11/00 वा. श्रीगोंदा येथील सुरक्षित ठिकाणी माझेकडील दुचाकीवाहनासह हजर असताना श्री. त्रिपुटे व सापळा पथक असे सदर ठिकाणी आले. मी शासकिय वाहनात बसुन श्री. त्रिपुटे व पंचांना कळविले की मला घोडे पोलीस यांचा दोन वेळा फोन आला होता, त्यांनी मला किती वाजता येता असे विचारले आहे, मी त्यांना थोडया वेळाने येते असे सांगितले आहे. त्याप्रमाणे घोडे पोलीस यांची भेट घेण्याकरीता मला व पंच नं. 1 यांना रवाना करण्याचे ठरले. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कार्यवाही बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या ताब्यात दिले. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील दुचाकी वाहनाने घोडे पोलीस यांची भेट घेण्याकरीता श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे जाण्याकरीता 11/28 वा. सुमारास रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही श्रीगोंदा पोलीस स्टेशन समोर गेलो. तेथे गेल्यानंतर मी माझे मोबाईल फोनचा स्पिकर चालु करून घोडे पोलीस यांना फोन करून मी पोलीस स्टेशन येथे

आले आहे असे सांगितले असता त्यांनी आलो पाच मिनिटात असे म्हणाले. त्यानंतर घोडे पोलीस हे पोलीस स्टेशनच्या बाहेर आले. त्यानंतर त्यांनी पंच नं. 1 यांचेबाबत विचारले असता मी त्यांना चुलत बहिण असल्याचे सांगितले. त्यानंतर घोडे यांनी आम्हाला चहा घेऊ असे म्हणुन पोलीस स्टेशनच्या समोरील चहाच्या दुकानात घेवुन गेले. तेथे घोडे पोलीस यांचेत व माझेत माझे मुलाचा मोबाईल परत देणेबाबत व आमचे प्रकरण मिटविल्याच्या कामाबाबत चर्चा झाली. त्या चर्चेदरम्यान घोडे पोलीस यांनी तुम्हाला काय दयायचेत तेवढे दया असे म्हणुन लाचेची मागणी केली. मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नाहीत असे म्हणाले असता त्यांनी तीन-चार हजार रूपये दया असे म्हणुन तडजोडीअंती 3,000/-रुपये लाचेची मागणी केली. तसेच घोडे पोलीस यांनी माझ्या मुलाचा मोबाईल माझेकडे दिला. मी त्यांना मोबाईल तुमच्याकडेच राहु दया असे म्हणाले असता त्यांनी मोबाईल घेवुन जा, येताना फोन करा, तिकडेच येईल मी असे म्हणाले. त्यांनतर मी व पंच नं. 1 तेथुन निघुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 11/55 वा. दरम्यान परत आलो. श्री. त्रिपुटे यांनी पंच नं. 1 यांना व मला घडलेल्या घटनेबाबत विचारले असता मी व पंच नं. 1 यांनी हकीकत सांगितली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले असता घोडे पोलीस यांनी आमचे प्रकरण आपआपसात मिटविण्याकरीता मध्यस्थी केल्याच्या

मोबदल्यात व माझा मुलगा सादिक याचा मोबाईल परत देण्याच्या मोबदत्यात तडजोडीअंती 3,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निश्पन्न झाले.

त्यानंतर मी लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी माझ्या बचतीतुन 3,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 06 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. श्री.त्रिपुटे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या जवळील हिरव्या रंगाच्या छोटया पाकिटात ठेवुन दिली. श्री.त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इषारा ठरवुन दिला. घोडे पोलीस यांनी मला फोन करा, तिकडेच येईल मी असे सांगितले असल्याने श्री. त्रिपुटे यांनी मला घोडे पोलीस यांचेविरूध्द सापळा लावण्याकरीता योग्य ठिकाणाबाबत विचारले असता त्यांना मी बगाडे कॉर्नर येथे सापळा लावता येईल असे सांगितले. त्याप्रमाणे घोडे पोलीस यांचेविरूध्द बगाडे कॉर्नर, श्रीगोंदा येथे लाचेचा सापळा लावण्याचे ठरले.

श्री.त्रिपुटे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे ताब्यात दिले. मला व पंच नं. 1 यांना माझेकडील दुचाकी मोटार सायकलने रवाना केले. आमचे पाठोपाठ श्री. त्रिपुटे व सापळा पथक शासकिय वाहनाने रवाना झाले. आम्ही सर्वजण श्रीगोंदा येथील सुरक्षित ठिकाणाहुन निघुन पोलीस स्टेशनकडे जाणारे रोडने बगाडे कॉर्नर येथे पोहोचलो. तेथे गेल्यानंतर मी मोबाईल फोनचा स्पिकर चालु करून घोडे पोलीस यांना फोन केला व बगाडे कॉर्नरला येता का असे विचारले असता अलिकडे या बाजारतळाजवळील कमाणीजवळ असे सांगितले. मी त्यांना दिल्ली गेट वेस का असे विचारले असता त्यांनी हो म्हणुन सांगितले. त्यानंतर मी व पंच 1 असे माझेकडील दुचाकीवरून श्रीगोंदा शहरातील दिल्ली वेस कमाणीजवळ आलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहनाने आले. सापळा पथक वाहनातुन खाली उतरून सदर कमाणीच्या आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले. थोडया वेळाने घोडे पोलीस हे त्यांचे दुचाकी वाहनाने आमच्या जवळ आले. त्यांनी मला मुलाला पाठवुन दयायचे ना असे म्हणाले असता मी त्याला टाईम भेटत नाही असे सांगुन आता काही प्रकरण झाले तर संभाळुन घ्या असे म्हणुन माझेकडील छोटया पाकिटात ठेवलेली लाचेची रक्कम माझे उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली असता त्यांनी चालतय चालतय असे म्हणुन सदरची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर मी मला ठरवुन दिलेला लाच स्विकारलेबाबतचा ईशारा केला. त्यावेळी श्री.त्रिपुटे, सापळा पथक, पंच क्र.2 असे माझेजवळ आले, पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझ्या ताब्यातुन घेवुन बंद केले, श्री. त्रिपुटे यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता मी समोरच दुचाकी वाहनावर असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन हे पोलीस श्री. घोडे आहेत. त्यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांनी पंच क्र. 2 च्या मदतीने घोडे पोलीस यांचेकडील 3,000/-रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली. सोबतच्या कर्मचा-यांच्या मदतीने घोडे पोलीस यांना ताब्यात घेतले. श्री. त्रिपुटे यांनी घोडे पोलीस यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संभाजी शिवाजी घोडे, वय 32 वर्षे पोलीस अंमलदार ब.नं. 2112, नेमणुक श्रीगोंदा पोलीस स्टेशन, रा. श्री. बनकर यांचे घरात भाडयाने, मांडवगण रोड, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर असे सांगितले. लाचेच्या नोटांच्या नंबरची खात्री करण्यात आली. त्यानंतर घोडे पोलीस यांना ताब्यात घेवुन श्री. त्रिपुटे व सापळा पथक शासकिय विश्रामगृहाकडे निघाले. मला श्री.

त्रिपुटे यांनी शासकिय वाहनाचे पाठोपाठ शासकिय विश्रामगृह येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी शासकिय विश्रामगृह श्रीगोंदा येथे आले. सदर ठिकाणी श्री.त्रिपुटे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले.तरी दिनांक 12/08/2025 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या समोरील चहाच्या दुकानात 11/28 ते 11/55 वा. दरम्यान घोडे पोलीस यांनी माझेकडे माझे मुलाचा मोबाईल परत दिल्याचे मोबदल्यात व आमचे प्रकरण आपआपसात मिटविण्याकरीता मध्यस्थी केल्याच्या मोबदल्यात त्यांचे स्वतःकरीता तडजोडी अंती 3,000/-रुपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम घोडे पोलीस यांनी लाचेचा सापळा कारवाई वेळी दिल्ली वेस कमाण, श्रीगोंदा येथे दुपारी 01/12 ते 01/28 वा. दरम्यान माझेकडुन स्विकारली म्हणुन माझी संभाजी शिवाजी घोडे, वय 32 वर्षे, पोलीस अंमलदार ब.नं. 2112, नेमणुक श्रीगोंदा पोलीस स्टेशन, रा. श्री. बनकर यांचे घरात भाडयाने, मांडवगण रोड, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

KIRAN BAJIRAO SHINDE(I (Inspector)) / 14901000362KBSM8001X

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Signature/Thumb impression of the complainant / informant.
(फिर्यादी / माहितीदेणा-याची सही/अंगठा):

सलमा बशीर सय्यद

Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.हे.कॉ./पपपट एस.यु.शिंदे
पोलीस ठाणे अंमलदार
पिंपरी पोलीस स्टेशन

Signature of Officer in charge,
Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): KIRAN BAJIRAO SHIN
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 14901000362KBSM800